# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-६४ दिनांक - २८/०२/२०२४

## स्त्री जातीचे नवजात बालकाची विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने त्यास उघडयावर टाकुन देणाऱ्या आरोपीतांचा शोध घेवुन, २४ तासाचे आत गुन्हा उघडकीस आणण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.२६/०२/२०२४ रोजी ०७:१५ वा.चे सुमारास यातील तक्रारदार हे पायी चालत जात असतांना, त्यांस सिध्दी इलेक्ट्रीक, शॉप नं.८, प्रिन्स अपार्टमेंट, जिवदानी रोड, विरार(पु.), ता.वसई, जि.पालघर येथील मोटर गॅरेजचे समोरील लोखंडी पेटीवर एक स्त्री जातीचे नवजात बालकाची जन्मतःच त्याची गुप्तपणे विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने कोणीतरी अनोळखी इसमाने उघडयावर टाकुन दिले बाबत माहिती दिली होती. तक्रारदार श्री.सचिन राऊळ वय वर्षे ३८ रा कारगिल नगर, मनवेलपाडा रोड, विरार पुर्व, ता.वसई यांचे तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. १८४/२०२४, भा.दं.वि.सं.कलम ३१७ प्रमाणे दि. २६/०२/२०२४ रोजी अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद केला आहे. रा

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार विरार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच घटनास्थळी भेट देवुन, घटनास्थळी मिळालेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजचे सुक्ष्म निरीक्षण केले असता त्यामध्ये दोन महिला सदरचा गुन्हा करतांना दिसुन आल्या होत्या. त्याअनुषंगाने अंदाजे २ ते ३ कि.मी. पावेतोचा एरिया डॉमिनेशन करुन त्या भागातील राहणाऱ्या लोकवस्तीवर लक्ष केंद्रित करुन एका घरातील व्यक्तीवर संशय बळावल्याने त्यांना विश्वासात घेवुन बारकाईने विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे. सदरचा गुन्हा अवघ्या २४ तासाचे आत उघडकीस आणलेला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक/राम कुंडगिर हे करत आहेत.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक अविनाश हाटखिळे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, संदिप शेरमाळे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

-----ooo-----